# चैतन्य लहरी

मराठी

नोव्हेंबर-डिसेंबर २०१६





आपण आता जेव्हा सगळे दागिने वगैरे करतो आईसाठी, किती सुंदर असतात. पण तुम्हीच माझे दागिने आहात. तुम्हालाच अंगावर मी लेवून घेतलेले आहे. त्या दागिन्यांमध्ये जर स्वच्छता नसली, त्याच्यामध्ये जर अशुद्धता असेल, म्हणजे त्याच्या अंगातले जे मुख्य गुण आहेत, तेच त्याच्यात नसतील, सोन्यात जर सोनं नसेल, सोन्याच्या जागी पितळ असेल, तर त्याला काय अर्थ आहे? तसेच तुमचे आहे. तुमच्या अंगातला जो मुख्य धातू आहे, तोच जर खोटा असला, तर त्याला घालून मी कुठे मिरवायचं?

प.पू.श्रीमाताजी, मुंबई, १४ जानेवारी १९८५



# या अंकात


आत्म्याचे ज्ञान ...४

(पूजा, पुणे, २५/१२/१९८६)

शक्तीमुळे माणसामध्ये भक्ती जागृत होते ...१०

(सार्वजनिक कार्यक्रम, पुणे, ००/०९/१९७९)

पवित्र आत्मा ...२२

(गणपतीपुळे, २५/१२/२००३)



पुणे, २५ डिसेंबर १९८६

# आत्म्याचे ज्ञान

आज मी मुद्दामून इंग्लिशमध्ये बोलले, पण तुम्हा सगळ्या पुणेकरांना इंग्लिश येतंय. तेव्हा जास्त काही त्याचा खुलासा करून सांगायला नको. पण ह्या लोकांना आज, ख्रिसमसच्या दिवशी काहीतरी ख्रिस्ताबद्दल सांगावे म्हणून मी सांगितलेले आहे. आता आपल्या संस्कारांमुळे ख्रिस्तांची आपल्याला फारशी माहिती नाहीये. पण ते बरोबर नाही. आपण त्याची माहिती करून घेतली पाहिजे. ती माहिती करून घ्यायला पाहिजे. कारण तो आज्ञा चक्रावर बसलेला आहे. आज्ञा चक्रावर बसलेल्या ख्रिस्ताला जर आपण जाणलं नाही, तर आपण गणेशाला जाणलं नाही. कारण गणेश हाच ख्रिस्त आहे. तेव्हा गणेशाने जगामध्ये येऊन काय कार्य केलं? त्याने अवतरण घेऊन काय काय कमाल केली? त्याने काय आपल्यासाठी केलंय? त्याचं जे काही कार्य आहे आणि त्याचा जो काही प्रादूर्भाव आहे, तो आपल्याला ख्रिस्ताच्या जीवनात मिळतो. नुसतं गणपती, गणपती करत बसतो. गणपती बसला, गणपती हे, ते, पण गणपती म्हणजे काय, करतो तरी काय आपल्यामध्ये? त्याचे काय गुण आहेत? तो शुभकारी आहे, अमुक आहे, तमुक आहे. त्याने कसं शुभ केलं! त्याचं जे काही कार्य होतं ते ख्रिस्ताच्या आयुष्यामध्ये आपल्याला दिसतं. म्हणून सर्व लोकांनी ख्रिस्ताचं चरित्र वाचून काढलं पाहिजे आणि विचारणा केली पाहिजे.

आता हे जे काही मागचे संस्कार आहेत, त्याप्रमाणे वागून चालत नाही. जसे इकडे हे लोक ख्रिस्ती धर्मातून आलेले आहेत, त्यांनी आपल्याकडचे सर्व अवतार कोणते होते? त्यांनी काय काय कार्य केलं? ह्याबद्दल माहिती करून घेतली. आणि कधीतरी तर ते आपल्यापेक्षाही जास्त आहेत. तेव्हा आपणही ख्रिस्तांबद्दल, मोहम्मदांबद्दल, इतरही जे मोठमोठाले सद्‌गुरू झाले त्यांच्याबद्दल माहिती करून घेतली पाहिजे. ह्याला कारण असं आहे, की उद्या तुम्हाला गुरूपद मिळालं, तुम्ही ब्रह्मनिष्ठ असलात, तुम्हाला जरी ब्रह्म काय आहे ते कळलं, पण जर तुम्हाला उद्या कोणाशी बोलायचं असलं, तर तुमच्याजवळ हे ज्ञान असायला पाहिजे. हे तुम्ही प्रत्येकाबद्दल उघडून, स्पष्टपणे समजवून सांगाल आणि गोष्टीचं निरूपण करू शकाल. जर ही माहिती तुम्ही आज मिळविली नाही, तर ह्या आजच्या आधुनिक काळामध्ये सहजयोग पसरणार नाही. सहजयोग हा आधुनिक काळात आलेला आहे. ह्या वेळेला सगळ्यांना सगळ्यांची माहिती झालेली आहे. सगळ्यांना कोण कोण लोक मोठ मोठे झालेले आहेत ते सगळं माहिती आहे. आपण एकएका विहिरीत आता नाही आहोत. मोठ्या अथांग सागरात आल्यामुळे, सगळ्यांनी सगळी माहिती, सगळ्या जातीच्या लोकांची, सगळ्या देशांच्या लोकांची, सगळ्या धर्माच्या लोकांची माहिती आपण करून घेतली पाहिजे. त्यांचं कुठे चुकलं, आपलं कुठे चुकलं, हे समजून घेतलं पाहिजे. तेव्हाच आपण खरे सहजयोगी आणि सद्‌गुरू होऊ शकता. त्यासाठी थोडासा तरी अभ्यास करावा लागेल आणि सर्वांनी तो मन:पूर्वक अभ्यास करावा, असं मी सांगते.

सगळ्यांना माझा अनंत आशीर्वाद आहे.

आज आपण बहुतेक पूजा जी आहे ती गायनानेच करूयात.

मी पूर्वी सांगितलेलेच आहे, की ख्रिस्ताची आई राधा म्हणजे महालक्ष्मी होती आणि महालक्ष्मी असूनसुद्धा तिने इतक शांतपणाने सगळं काही सहन केलं आणि जशा रीतीने वागली, ते फक्त एवढ्यासाठी की ख्रिस्ताचं जे काही उदाहरण होतं, ते अगदी पूर्णपणे जमलं पाहिजे. कोणत्याही तऱ्हेची त्याच्यामध्ये अशी खोट आली नाही पाहिजे, की लोकांनी असं म्हटलं नाही पाहिजे, की त्याच्या आईमुळे असा दोष आला. त्या बाईने जसं सहन केलं. आपल्या मुलाचा जसा त्याग केला, त्याला क्रॉसवर जातांना पाहिलं. ह्या सर्व गोष्टी ज्यांनी इतक्या सहन केल्या, अशा या महालक्ष्मी स्वरूपात, मेरीच्या उदाहरणात असं पाहिलं पाहिजे, की जे आपण मुलांबद्दल, 'माझा मुलगा, माझा मुलगा' करत बसतो, ते सोडून 'माझा मुलगा आत्म्याच्या दृष्टीने किती पुढे आलेला आहे,' ते पाहिलं पाहिजे. आत्म्यामध्ये त्याचा किती लाभ झालेला आहे, हे पाहिलं पाहिजे.

आपण सर्व आता सहजयोगी झालो आहोत आणि सहजयोगामध्ये येऊन आता पुष्कळ कमवलंय. आणि मुलांना देण्याचं काय आहे आपल्यामध्ये, ते पाहिलं पाहिजे आणि ते देण्यासारखं एकच आहे, ते म्हणजे आत्म्याचं ज्ञान. ते मिळालं पाहिजे. ते सर्वांना दिलं पाहिजे आणि सर्वांनी मिळवलं पाहिजे. ह्यावेळेला मुद्दामून मी म्हटलं की तुम्ही सगळ्यांनी इतक्या लांब या. कारण इतक्या लांब आल्यावर आपल्या लक्षात येईल, की किती काबाडकष्ट करून लोक चालतात, लोक राहतात. आपल्याला लहान लहान गोष्टींचा त्रास होतो आणि आपण थोडासाही त्याग करायला तयार होत नाही. प्रत्येक गोष्टीमध्ये आपल्याला गोंजारून सांगावं लागतं, असं करा, तसं करा. अशा रीतीने सहजयोगामध्ये तुम्ही कसे पारंगत व्हाल आणि पुढे वाढाल. जरासासुद्धा त्याग करायला मंडळी तयार होत नाहीत. हे बरोबर नाही. आणि पुणेकरांबद्दल सारखं मला ऐकायला मिळतं, की इथले लोक अगदी फुकटखोर आहेत, ते कधीच एक पैसा काढणार नाहीत. जोपर्यंत तुम्ही आपली प्रवृत्ती बदलणार नाहीत, तोपर्यंत हे पुणेकर कसे बदलणार! तुम्हीच त्यांचे पुढारी आहात. तुम्हीच त्यांचे उदाहरणं आहात. ज्याने की हे लोक बघतील, की हे लोक काहीतरी विशेष आहेत. आणि तुमच्यामध्ये जर ह्याच्याबद्दल, त्याच्याबद्दल, पैशाबद्दल एवढी तळमळ पाहिली, तर ते लोक म्हणतील, की सहजयोग करून फायदा काय? सगळे आमच्यातलेच आहेत.

दुसरं म्हणजे, वारंवार मी म्हटलेले आहे, की भाऊबंदकी. आपल्यामध्ये हा एक शाप आहे. आणि ते मी परत बघते. पैशाला धरूनच भाऊबंदकी करतात. हे पैसे कुठे गेले, इतका पैसा कशाला खर्च केला? हे काय झालं, ते काय झालं? सगळी भांडणं पैशाला धरून करायची. याचं मला मोठं आश्चर्य वाटतं. तुमच्यासाठी आम्ही सगळं करायला तयार आहोत. पण फुकटात घ्यायचं! म्हणजे आत्मसन्मान माणसाला पाहिजे. माताजींनी खर्च करायचा आमच्या खाण्या-पिण्याचा. हे काही ठीक नाही. वर्षभरात जरी तुम्ही थोडेसे पैसे एकत्र केले, तरी सहज होऊ शकतं. तशी ही मंडळी खर्च करतातच आणि आम्हीही करतोच. पण बरं दिसत नाही. आत्मसन्मानाला धरून नाहीये.

आता ही तुम्ही कोठे खेडेगावात गेलात, आता परवा मी नारायणगावला गेले होते. लोकांनी सगळा स्वयंपाक करून ठेवला होता. मला बसवलं, सगळं दिलं. त्यात काही पैसे पाहिजेत वगैरे असं काही म्हटलं नाही. आदरातिथ्य होतं. जसे चार पाहुणे आपल्या घरी आले, त्यांच्याकडे आपलं लक्ष असलं पाहिजे. सहजयोग्यांमध्ये विशेष करून अजून आश्चर्य वाटतं की भाऊबंदकीचा शाप दिसतोय. लहानलहान गोष्टींसाठी लोक भांडणं करतात. त्यांचं हे झालं, त्यांचं ते झालं. समजा एखाद्या लीडरला म्हटलं की आता हा लीडर झाला. तर तो लीडर नाही त्याचं भांडण. म्हटलं की ह्या माणसाला व्हायब्रेशन्स नाहीत त्याला सध्या बंद करा तर ते भांडण. प्रत्येक गोष्टीमध्ये भांडकुदळपणा. लग्नातसुद्धा आपल्याकडे इतकी भांडणं आपण करतो. जेव्हा लग्नासारख्या शुभस्थळी आपण हे करतो, तर आपल्याला असं वाटतं, की कुठेही भांडणं केली तरी भांडणं हे काही वाईट नाही. हे फार वाईट आहे. परमेश्वराच्या दृष्टीने हे फार चुकीचं आहे आणि ते केलं नाही पाहिजे. त्याबद्दल ख्रिस्तांनी एक शब्द वापरला आहे, 'मरमरिंग सोल्स'. जे लोक मागे काहीतरी बोलत असतात सारखे, ह्यांना काहीतरी बोलायचंय, त्यांना काहीतरी बोलायचंय. इकडून तिकडे लावालावी करायची. अत्यंत क्षुल्लक आणि क्षुद्र गोष्टी आहेत. आणि तुमच्या पुण्याला आम्ही पुण्यपट्टणम म्हणतो, पुण्याला सगळी पुण्याई आणलेली आहे म्हणतो, सगळं काही म्हणतो आणि तेवढं करून ही अशीच परिस्थिती आहे, ते पाहून फार वाईट वाटतं.

पुढच्या वर्षी सगळ्यांनी अगदी जोमाने प्रयत्न करायचा. इथली मुलंसुद्धा शहाणी आहेत. त्यांनीसुद्धा आपले पैसे जमा करून सगळ्यांनी दिले. माझा अगदी जीव भरून आला. किती चांगली मुलं आहेत ही! ती तुमचीच मुलं आहेत नां! मग मोठ्यांना काय होतंय? मोठे असे का वागतात? थोडं तरी हृदय उघडून काम केलं पाहिजे सहजयोगात. काही तुमच्यावरती बोजा नाही सहजयोगाचा. काही तुमच्याकडून आम्ही काही घेत नाही. काही तुमच्याकडून आम्हाला नकोय. कितीतरी आम्ही तुम्हाला दिलेले आहे. म्हणजे वस्तुमात्र दिलेले आहे. नुसतं वस्तुमात्र पाहिलं तर किती तरी दिलेलं आहे. पण तरीसुद्धा अशा तऱ्हेच्या गोष्टी ऐकायला मिळाल्या की मला फार दु:ख होतं. तेव्हा तुम्ही आपल्या आत्म्याला परत क्रुसावर टांगू नका. परत पुनर्जन्म झाला आजच्या दिवशी असं समजून, आता

**मुलांना देण्याचं काय आहे आपल्यामध्ये, ते पाहिलं पाहिजे आणि ते देण्यासारखं एकच आहे, ते म्हणजे आत्म्याचं ज्ञान. ते मिळालं पाहिजे. ते सर्वांना दिलं पाहिजे आणि सर्वांनी मिळवलं पाहिजे.**

आम्ही खुल्या दिलाने राहू असं ठेवायचं आणि मान-पानाने रहायला पाहिजे. आत्मसन्मानाने रहायला पाहिजे. एवढं कृपा करून तुम्ही लक्षात ठेवा.

आजच्या शुभदिवशी मला परत म्हणावं लागतं. कारण पुण्याला आता तुमची माझी परत भेट केव्हा होईल मला सांगता येत नाही. तेव्हा कृपा करून ह्याबद्दल तुम्ही काळजी घ्यावी. असं वागू नये. नाहीतर सगळे एकाबरोबरच खाली जातील. आजच्या ह्या दिवशी सगळ्यांनी एक तरी व्रतनिश्चय ठरवला पाहिजे, की ज्या ख्रिस्तांनी आपल्या आयुष्याचं बलिदान दिलं, तिथे आम्ही जर त्याला आमचा मोठा भाऊ मानलेलं आहे, तर आम्ही काय केलं पाहिजे? आमच्या हातून काय झालं पाहिजे? आम्ही इतकं सहजयोगात मिळविलेले आहे. आता आम्ही सहजयोगात काय केलं पाहिजे? काही तुमच्याकडे पैसे वगैरे मागतच नाही आम्ही. पण खाण्या-पिण्याचे आणि वाहतुकीचेसुद्धा तुम्ही पैसे द्यायला तयार नसलात तर कसं करणार? त्यावर पण भांडाभांडी करता. पुढच्या वेळेला असं झालं नाही पाहिजे. लोकांनी सांगितलं, की जसं आम्ही वाहतुकीचे आणि खाण्या-पिण्याचे पैसे मागितले तसं कोणीसुद्धा हात वर केला नाही. ४०-४५ रुपयेसुद्धा जर तुम्ही काढू शकत नसलात, एवढी जर भिकार दशा असली तर सहजयोगात तुम्ही राहिलं नाही पाहिजे. आमच्यावरच बोजा पडणार. म्हणजे सगळ्या भिकाऱ्यांना पाळण्याचा आम्ही काही मक्ता घेतलेला नाही. जर एवढी परिस्थिती असली तर मुळीच सहजयोगात राहू नये. ज्या लोकांना इतकंही जमत नाही, ज्या लोकांना फुकट खायचंय, ही काही खैरात वगैरे नाही. आणि ह्या गोष्टी वाहवत जातात कधीकधी इतक्या, की त्या जर सांगितल्या नाहीत तर थांबवल्या जात नाहीत. आणि तुमचे लीडरसुद्धा थकून म्हणतात, आम्हाला नको रे बाबा हे! त्यामुळे तफावत आलेली आहे. त्यामुळे लोक असं समजतात की, हे लीडर लोक जे आहेत ते आम्हाला त्रास देताहेत. माताजींजवळ जाऊ शकत नाही. वगैरे वगैरे. ह्या सगळ्या गोष्टी सोडल्या पाहिजेत. आता आम्ही सगळे एक झालेलो आहोत. सहजयोगासाठी आम्ही आत्तापर्यंत काहीही केलेलं नाही. गांधीजींच्या वेळेला मला आठवतं, की माझ्या आईने तिच्या स्वत:च्या बांगड्या दिल्या. गोठ दिले, पाटल्या दिल्या, सगळं सगळं घरातलं दिलं तिने. आणि आजकाल लोकांना चार पैसे काढता येत नाही. म्हणजे इतकी दुर्दशा आहे का आपली? तशी मुळीच नाहीये.

ही मंडळी इतक्या लांबून इथे येतात. तितकीच मंडळी तुम्ही इथे आलेले आहात आज इथे. त्यामुळे तुमच्यावर खर्चाचा बोजा नाहीये. हे शोभतं कां! पुण्याच्या सगळ्या लोकांना सांगा, की माताजींनी सांगितलं, की प्रत्येक पुण्याच्या लोकांना आजच्या ह्या कार्यक्रमाला कसंही करून उभं राहिलं पाहिजे. कारण हिमालयावरतीसुद्धा लोक जातात देवाकडे. मग हा हिमालय नाहीये! तुम्हाला एवढं तुडवायला नव्हतं होत? सगळी व्यवस्था केलेलीच होती. पण तरीसुद्धा जेवढे लोक तिथे आले होते, तितके काही आज आले नाहीत. आणि पुण्यात झालं तर आम्ही येऊ, नाहीतर येणार नाही. हे असं करणाऱ्या लोकांना, कधीही त्यांची पैशाची स्थिती ठीक होणार नाही. आणि आता गणपतीपुळ्यालासुद्धा व्यवस्थित यावं. पुष्कळांनी यावं. काही

त्याच्यामध्ये एवढा खर्च नाहीये. मी सगळा बरोबर करून ठेवलेला आहे. जितका जरुरी लागेल तितका. फक्त खाण्यापिण्याचा असेल तेवढाच. त्या पलीकडे काही नाही. वर्षात एकवेळा. आणि इतकी काही तुमची दुर्दशा नाहीये. दोन पैसे जर एकत्र जोडून ठेवले तर तुम्ही वर्षाला थोडे पैसे एकत्र करू शकता. असाच एखादा असला तर आम्ही करू शकतो त्यांची व्यवस्था. पण प्रत्येकाने जर अशीच भूमिका घेतली, तर पुण्याहून कोणीच जाणार नाही. खेडेगावात मात्र वेगळं आहे. खेडेगावात कधीच हा प्रश्न उभा रहात नाही. शहरात येऊनच आम्हाला प्रत्येक गोष्ट पाहिजे. सिनेमा रोज पाहिजे. हे झालंच पाहिजे. हातात आमच्या बांगड्या असल्याच पाहिजेत. गोठ असलेच पाहिजेत. पाटल्या असल्याच पाहिजेत. हे असलंच पाहिजे. मग आम्ही देवाला गेलो किंवा नाही गेलो, पूजेला गेलो किंवा नाही गेलो. ते एवढं मात्र पाहिजेच सगळं. पाहिजे म्हणजे पाहिजेच. जेवायला भरपूर पाहिजे. जेवायला अमकं पाहिजे, तमकं पाहिजे. ह्या सर्व गोष्टींकडे आपलं जास्त लक्ष आहे, देवाकडे कमी, मग आमची का प्रगती होत नाही, हे लक्षात आणलं पाहिजे. आता आजच्या दिवशी प्रत्येकाने निश्चय करायचा, की आम्ही इकडेतिकडे इतके पैसे वाया घालवतो. त्या पेक्षा थोडेसे पैसे आम्ही वाचवलेले बरे. ह्या लोकांनी सगळं सोडलंय. सगळे छंद सोडलेत आणि आता म्हणतात 'आमच्याकडे पैसे मागतात.' करायचं काय पैशांचं? तशीच सगळी जी काही तुम्ही गुलामी केलेली आहे आजपर्यंत, ते सगळं सोडून परमेश्वराच्या साम्राज्यात पूर्णपणे उतरलं पाहिजे.

आजच्या दिवशी मला सांगायला वाईट वाटतं, पण सगळा जो मागचा इतिहास आहे, तो माझ्या डोळ्यासमोर उभा राहतो आणि मग मला असं वाटतं की हे सांगितलं नाही तर हे वहावतच जाणार आहे. म्हणून आत्ताच आळा घातला पाहिजे. ह्या गोष्टीला पूर्णपणे आळा घातला पाहिजे. आणि आपापसातली भाऊबंदकी पूर्णपणे सोडून टाकली पाहिजे. एकाच्या विरुद्ध दुसरा, दुसऱ्याच्या विरुद्ध तिसरा असं नाही. सगळ्यांनी मिळून मिसळून, इथे चौदा देशातले लोक कसे मिळून मिसळून बसलेत आणि आपण एका देशातलेच नाही, तर एका प्रांतातलेच नाही, तर एका शहरातले लोकसुद्धा एकत्र येऊन बसू शकत नाही म्हणजे काय म्हणावं! म्हणजे आपण जन्मलोच हातात सोटे घेऊन असं मला म्हणावं वाटतं. जन्मल्याबरोबर मारामाऱ्या. इतकं आहे पुण्यामध्ये! पुष्कळशा सुंदर गोष्टी आहेत. पुष्कळसे सहजयोगी, जे तरुण सहजयोगी आहेत, ते फार सुंदर आहेत. त्यांच्या मुली फार छान आहेत. सगळ्याचं मला इतकं कौतुक वाटतं. सगळे इतके प्रेमळ आहेत. सगळं काही. पण जे मोठे सहजयोगी आहेत, त्यांच्यामध्ये जराशी अजून मेहनत पाहिजे. तेव्हा कृपा करून आजच्या दिवशी सगळ्यांनी व्रत घेतलं पाहिजे, की आम्ही सहजयोगी आहोत आणि सहजयोगाच्या मार्गात आलेलो आहोत. यात अग्रेसर होण्यासाठी जे जे करावं लागेल, ते आम्ही करू. असं व्रत घ्या म्हणजे परमेश्वर सगळ्यांची मदत करणार आहे.

परमेश्वर तुम्हा सगळ्यांवर आशीर्वाद देवो.



# शक्तीमुळे माणसामध्ये भक्ती जागृत होते

**पुणे, ०० सप्टेंबर १९७९**

परमेश्वर आहे, अशी भावना माणसामध्ये कशी जागृत होते? कुठून जागृत होते? परमेश्वराला शोधलं पाहिजे ही तरी भावना कुठून येते? पहिल्यांदा असा विचार करावा, की अमिबापासून मानवापर्यंत येतांना ही भावना माणसामध्ये नव्हती. तो आधी प्राणी म्हणून वावरत होता. तेव्हा त्याच्यामध्ये परमेश्वर वगैरे आहे, ही भावना नव्हती. पुढे आदिमनुष्य जेव्हा झाला, त्यालासुद्धा परमेश्वर आहे वगैरे काही माहिती नव्हतं. फक्त त्याच्यामध्ये थोडीशी भीती किंवा निसर्गाशी झगडण्याची एक प्रवृत्ती होती. त्या प्रवृत्तीलाच तो परमेश्वर मानत होता. हळूहळू हा मानव उत्क्रांतीवर आला. तेव्हा त्याच्या असं लक्षात आलं, की अशा काही गोष्टी जगात आहेत, की त्या केल्यामुळे बरं वाटत नाही. अशा रीतीने आपण जर वागलो, तर आनंद वाटत नाही.

विशेषत: आपल्या देशात, भारतवर्षामध्ये हजारो वर्षापूर्वी पुष्कळ ऋषीमुनींनी या गोष्टींचा विचार केला. त्याला कारण असं, की ही भारतभूमी आहे. अनेक आशीर्वादांनी प्लावित आहे. त्यातला मुख्य आशीर्वाद असा आहे, की आपल्याला निसर्गाशी एवढं झगडावं लागत नाही. आता लंडनला आपण म्हटलं, की सरळ मोटारीत बसून कुठे जायचं, तर शक्य नाही. निदान दहा मिनिटं तरी आधी तुम्हाला तयारी करावी लागते. सगळे कपडे घालावे लागतात, तेव्हा तुम्ही बाहेर निघू शकता. अशी दारं उघडी टाकून तुम्ही बसू शकत नाही. बहुतेक पाश्चिमात्य देशांमध्ये एक तर अत्यंत कडक थंडी किंवा अत्यंत कडक उन्हाळा, वगैरे वगैरे अनेक परिस्थितीशी झुंज देण्याचे प्रकार आहेत. पण आपल्या देशामध्ये जंगलातही राहता येतं. त्यामुळे एकप्रकारची संतोषजनक प्रवृत्ती माणसात आली. नंतर ध्यानधारणा करून ह्या ऋषीमुनींच्या लक्षात असं आलं, की आपल्यामध्ये स्वयंचालित एक संस्था आहे. त्या संस्थेमुळे आपल्याला अस्तित्व आलेलं आहे. आपल्यामध्ये क्रियाशीलता आलेली आहे. त्या संस्थेमुळे आज आपण अमिबाचे माणूस झालेलो आहे. त्यांच्या हे ही लक्षात आलं, की ही संस्था अदृश्य स्वरूपात, शक्ती स्वरूपामध्ये आपल्या मणक्याच्या हाडामध्ये असते. मनन शक्तीमुळे त्यांनी हे गाठलेलं आहे. मग त्याच्यावर पुष्कळ आविष्कार झाले.

पैकी पहिली शक्ती जिला आपण महाकाली शक्ती म्हणतो, ज्या शक्तीने आपलं अस्तित्व असतं, त्या शक्तीमुळे माणसामध्ये भक्ती जागृत होते, असं सिद्ध झालं आहे. कारण ज्या माणसाला आपल्या अस्तित्वाचीच भीती वाटते, तो डोळ्यापुढे मृत्यू बघतो, तेव्हा त्याला वाटतं की काहीतरी आपल्यापेक्षा जास्त शक्तिशाली, समर्थ अशी एक शक्ती आहे. कोणाचा मृत्यू कधी होईल हे सांगता येत नाही. का होतो? हे सांगता येत नाही. कसा होतो? हे सांगता येत नाही. तेव्हा आपल्या अस्तित्वाला कारणीभूत असणारी कोणती न कोणती फार प्रचंड शक्ती असायला पाहिजे. ह्या लोकांनी फार मेहनत करून, अनेक वर्षे तपश्चर्या करून त्या शक्तीचे पूर्णपणे अध्ययन केले. त्याचे परीक्षण केले आणि सबंध आविष्कार पूर्णपणे लक्षात घेऊन, अत्यंत गुप्त रीतीने त्यांनी हे कार्य सुरू केलं. तिकडे भक्तीरसामध्ये लोक रंगून जाऊ लागले. तसेच ज्या लोकांनी असा विचार केला, की आपल्याला ह्या पाच, पंचमहाभूतांवरही विजय मिळवला पाहिजे,

त्यांनी यज्ञ वगैरे करून वेदांच्या आधारावर आजचे सायन्स उभे केलेले आहे.

असो, तर भक्तीचा जो साठा आज आपल्याला ह्या महाराष्ट्रात, ह्या पुण्यभूमीत मिळतो, त्याला दुसरं कारण म्हणजे महान साधु-संतांनी ह्या भूमीवर जन्म घेतला. परमेश्वर आहे, इतकेच नव्हे पण त्याची सर्वव्यापी शक्ती कार्यान्वित असते, तसेच ज्ञानेश्वरांसारख्या फार प्रचंड बुद्धिमान आणि अत्यंत तपस्वी पुरुषाने असं प्रतिपादित केलं, की आपल्यामध्ये कुंडलिनी नावाची एक शक्ती आहे आणि त्या शक्तीच्या जागरणाने माणसाला आत्मसाक्षात्कार घडतो. तिचं वर्णन केलं. त्यामुळे लोकांना ह्याच्याबद्दल माहिती झाली. पण जे कार्य अनंत वर्षांपासून ह्या भूमीत होत होतं आणि महाराष्ट्रातही झालं आहे, त्याबद्दल ह्या साधु-संतांचे जितके उपकार मानावेत, ते थोडेच आहेत. आम्ही नुसते आता घ्यायला आलेलो आहे, त्याचं फळ. म्हणजे भक्तीभाव हा आत आपल्या महाराष्ट्र समाजामध्ये फळत आहे. प्रत्येकाच्या घरी कुलस्वामिनी आहे. प्रत्येकजण काही न काही तरी दोन मिनिटं परमेश्वराची आठवण करतो. फुलं वाहतो. ह्या पुण्यालाच कितीतरी मारूतीची देवळं आहेत. तेव्हा ह्या सर्व भक्तीला काहीतरी अर्थ असायला पाहिजे. आंधळ्यासारखी भक्ती आपण करत राहिलो, वर्षानुवर्षे, पिढ्या न् पिढ्या, ह्या सर्व गोष्टी होत आल्या, पण त्याच्यापासून काहीही लाभ झाला नाही, तर हे असेच होत राहिले, तर उद्या हा तुमचा सुंदर वेल तुटून जाईल. त्याला थोडीशी बुद्धीची साथ द्यायला पाहिजे.

त्यात उलट झालं. जेव्हा बुद्धिवादी लोक जन्माला आले, तेव्हा त्यांनी असा प्रश्न विचारला, की ह्या भक्तीला काही अर्थ आहे किंवा नाही? हा परमेश्वर म्हणून तरी कोणी आहे किंवा नाही? त्याची ती जी सर्वव्यापी शक्ती म्हणतात ती आहे किंवा नाही? तरीसुद्धा ह्या महाराष्ट्रामध्ये घरोघरी देवपूजा होत असते. तेव्हा जरी कितीही आव्हान बुद्धिवाद्यांनी केलं, तरीसुद्धा असं म्हणता येत नाही की इथून भक्तीही उठली आहे. पण भक्तीला जोपर्यंत फळं लागणार नाही, जोपर्यंत त्याचा काहीतरी पडताळा लोकांसमोर येणार नाही, परमेश्वरावर विश्वास करणं फार कठीण होईल लोकांना! कारण बुद्धीची भरारी फार विक्षिप्त असते. पाश्चिमात्य देशांमध्ये बुद्धीच्या भरारीने लोकांनी अहंकार गाठलेला आहे. आणि तिथले लोक सर्रास म्हणतात, की परमेश्वर म्हणून कोणी वस्तू नाही. परमेश्वराचं अस्तित्वच ते लोक मानायला तयार नाहीत. तेव्हा अशा स्थितीत सहजयोग आज महायोगाच्या स्थितीला आलेला आहे. ह्या दोन भक्ती आणि ज्ञान किंवा क्रिया म्हणा, ह्याच्या मधोमध सहजयोग जन्माला आलेला आहे आणि हा उत्क्रांतीचा मार्ग, सुषुम्नेचा मार्ग आहे. महालक्ष्मीचा मार्ग आहे.

कुंडलिनीवर आत्तापर्यंत पुष्कळ कार्य झालेले आहे! हे पहिल्यांदाच होत आहे अशातलं नाही. म्हणजे इथपर्यंत, की कृष्णाने ज्यावेळी रास रचली किंवा गवळणींच्या घागरी फोडल्या होत्या, तेव्हाही ते सहजयोगच करत होते. त्या घागरी अशा अचूक फोडत असत, की यमुनेचं चैतन्य लहरींनी भरलेलं पाणी त्या गवळणींच्या पाठीवर बरोबर वाहून त्यांच्या कुंडलिनीला चेतना देत असत. त्या सर्व खेळामध्ये सहजयोगच होता. राम आणि सीतेच्या सगळ्या अनवाणी पदयात्रेतसुद्धा सहजयोगच होता. आपल्या महाराष्ट्रात पायी चालून, सीतेने ही भूमी

पुनीत केलेली आहे. त्या सर्वांचे परिणाम ह्या वातावरणात आहेत. पण आता यांत्रिक युगामध्ये, विशेषत: शहरामध्ये, मनुष्याचं चित्त इतकं बाहेर आलेलं आहे, की त्याची संवेदन शक्ती फारच कमी झालेली आहे. कोण खरा, कोण खोटा? कोण साधू, कोण भोंदू? कशाचीही ओळख माणसाला राहिलेली नाही. ह्या संवेदन शक्तीच्या अगदी अधोगतीला पोहोचलेल्या मानवाला, जागृत करणं फार कठीण काम आहे. त्यातून जंगलामध्ये जाऊन हजारोंमधून एक मनुष्य शोधून काढायचा आणि त्याची कुंडलिनी जागृत करायची! म्हणजे दुसरं कठीण काम आहे. लोकांना आजकाल वेळच नाही मुळी देवासाठी. पण हे झालेच पाहिजे. हे परमेश्वराचं कार्य आहे. परमेश्वराने सारी सृष्टी एवढ्यासाठी केली, मानव एवढ्यासाठी निर्माण केला, त्याच्यात भक्ती घातली, त्याला सर्व पंचमहाभुतांची मदत झालेली आहे. पूर्वी आपल्याला कोणत्याही कामाला पुष्कळ वेळ मिळत असे आणि करावं लागत असे. समजा जर आपल्याला पोळीच करायची असली, तर तासन् तास मेहनत केल्यावरती कुठे पीठ तयार होतं असे. त्याच्याआधी कोणी पोळीसुद्धा खाऊ शकत नसे. कच्चेच गहू खात असतील बहुतेक. पण आज तसं नाहीये.

ह्या पंचमहाभुतांवरती जी आपण ...........(अस्पष्ट) केलेली आहे, त्यामुळे आपल्याला अनेक आयुधं सायन्सच्या आविष्कारामुळे मिळालेली आहेत. पण त्या सर्वांचा लाभ काय आहे? त्याचा लाभ एवढाच आहे, की आपल्याजवळ वेळ जास्त आहे. सगळ्यांजवळ घड्याळं आहेत. सगळेजण घड्याळं बघतात. वेळ वाचवला पाहिजे, वेळ वाचवला पाहिजे. वेळ वाचवून करायचं काय आहे? तर तो वाया घालवला पाहिजे, रेस मैदानात! हा जो वेळ वाचलेला आहे, हा फार महत्त्वाचा आहे आणि जर त्याचं माहात्म्य आपल्याला कळलं नाही, तर आज जे पाश्चिमात्य देशांमध्ये तऱ्हेतऱ्हेचे, नाना प्रकारचे, नाना भोंदू लोकांचे जे उपद्रव सुरू झालेले आहेत ते इथे सुरू होतील. तेव्हा हा जो आपल्याजवळ वेळ अधिकचा मिळालेला आहे, हा फार महत्त्वाचा आहे आणि तो आपल्या उत्क्रांतीसाठी आहे. आपली उत्क्रांती व्हावी म्हणून आपल्या भक्तीने साथ दिलेली आहे, तशी सर्व पंचमहाभुतांनी आपल्याला साथ दिलेली आहे! आता मानव ह्या स्थितीला आलेला आहे, की ह्याला एकच पुढे पाऊल टाकायचं आहे. एकच पाऊल पुढे! इथे कुंडलिनीचा अंकुर फुटला, की मनुष्याचा संबंध परमेश्वराशी झाला! हाच योग गाठायचा आहे. हा महायोग, अगदी तो क्षणच फक्त गाठायचा आहे! अशा क्षणी माणसाचं डोकं असं विक्षिप्त झालेलं आहे! कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नाही. म्हणजे ज्यांना आपण धार्मिक म्हणतो, ते इतके अंधश्रद्धेने बांधलेले आहेत, की त्यांच्याकडे फक्त दांभिक लोकच जाऊ शकतात. खोटे लोक जाऊ शकतात.

आता परवा मी सासवडला गेले होते. तर एक बाई आल्या आणि त्यांनी माझ्या पायावरती दहा पैसे चिकटवले. मी त्यांना म्हटलं, 'मी पैसे वगैरे घेत नसते.' त्या म्हणाल्या, 'तुम्हाला जास्तीचे पाहिजेत का माताजी?' म्हटलं, 'अहो, मी पैसे वगैरे घेत नसते.' तर त्या अगदी उदास झाल्या. 'आजपर्यंत आम्ही कोणी असे गुरू बघितलेच नाही, की जे पैसे घेत नाहीत!' म्हणजे सत्य काय आहे आणि ते कसं मिळवायचं? ते सोडून, आम्ही कसं सत्याला आपल्या हातात आणू शकतो, आम्ही कसं परमेश्वरी शक्तीला .........(अस्पष्ट) करू शकतो, इकडे लोकांचं लक्ष

आहे. त्यामुळे असे गुरू आवडतात जे पैशाने विकत घेऊ शकतात. ज्यांच्या घरी जास्त श्रीमंती असेल त्यांच्याकडे असे गुरू जातील आणि म्हणतील, 'बरं, छान आहे! तुम्ही श्रीमंत लोक आहात नां! आम्ही तुमच्याकडे आलो. आता आम्हाला निदान पाच हजार रुपये तरी द्या. आम्ही तुमच्याकडे आलो, तुम्हाला आशीर्वाद दिला.' परत ते गुरू गेल्यावर त्यांचं वाटोळेच होणार. पाच हजार रुपये त्या वाटोळं होण्याचे दिले तर काही हरकत नाही. ह्याप्रमाणे आपल्या देशामध्ये, विशेषतः महाराष्ट्रामध्ये अत्यंत अंधश्रद्धेचं प्रमाण दिसेल. म्हणून मी म्हणते बुद्धीची थोडी साथ असायला पाहिजे. परमेश्वराला तुम्ही विकत घेऊ शकत नाही. फक्त परमेश्वराशी एकाकार होऊ शकता. असं सगळ्यांनी सांगितलेलं आहे.

परमेश्वर प्रेमाचा भुकेला आहे. ज्ञानेश्वरांनी जर सांगितलेलं आहे, की कुंडलिनी जागृती हाच एक मार्ग आहे, त्या पलीकडे दुसरा मार्ग नाही. इतकेच नव्हे तर आदि शंकराचार्यांनी ह्या कुंडलिनी जागृतीवर तसेच शक्तीवर आणि देवीवर अनेक भाष्यं लिहिलेली आहेत. तरीसुद्धा लोकांचा मूर्खपणा असा, की ते नुसती पारायणं करत बसतात सकाळपासून संध्याकाळपर्यंत. 'अरे काय वाचता तुम्ही?' 'आम्ही पारायणं करतो आहे.' 'कशाची?' 'आदि शंकराचार्यांची.' त्यांनी काय सांगितलं, की कुंडलिनी जागृती झाली पाहिजे. 'काय वाचता तुम्ही?' 'कुंडलिनी जागृती झाली पाहिजे, कुंडलिनी जागृती झाली पाहिजे.' अशाने काय होणार आहे? तेव्हा बुद्धीची सांगड अशी घालायची की हे लोक जे सांगून गेले, हे काहीतरी विशेष आहे. एकतर हे खोटं सांगून गेले आणि जर खरं सांगून गेले, तर हे घडलं पाहिजे. त्याची भविष्यवाणी इथून तिथून सर्व पुस्तकातून आहे. म्हणजे खऱ्या लोकांच्या पुस्तकातून आहे. म्हणजे बायबलमध्ये सुद्धा ह्याची भविष्यवाणी आहे, की हे असं होणार आहे. त्यांनी आदिशक्तीला 'होली घोस्ट' म्हणून म्हटलेलं आहे. तसेच शंकराचार्यांनी सांगितलेलं आहे की, चैतन्य शक्ती ही 'सलिलं, सलिलं,' थंड थंड! हातामध्ये, थंड वारा व्हावा, अशा रीतीने चैतन्य शक्तीचा आभास होतो. हे सगळं सांगत असूनसुद्धा सव्वा रुपया देऊन आपण ब्राह्मण घरी बोलवायचा. 'चला, मम म्हणा.' झालं म्हणजे सगळं संपलं. मला आधी सुरुवातीला समजत नसे, की सगळं दिसत असून, की हा ब्राह्मण काही ठीक नाहीये बुवा. हा पैसे घेतो. तरी हे लोक असं कसं करतात? बरं, सगळ्यांना माहिती आहे. चिपळूणकर शास्त्रींनी तेव्हा लिहून ठेवलं होतं, की आजकाल ब्राह्मण ठेवले जातात. तरीसुद्धा आपण अशा ह्या धार्मिक कृत्यामध्ये, इतके फसलेले आहोत, की त्याच्यातलं तथ्य, मर्म आणि सत्त्व आपण बघत नाही.

दुसरं म्हणजे असं, की देवळामध्ये जाणं! ठीक आहे, तुम्ही देवळात जा. पण त्या देवळामध्ये ती मूर्ती जागृत आहे की नाही ह्याचं काय प्रमाण आहे? तिथे जो गुरू बसलेला आहे, तो जागृत आहे की नाही, त्याचं काय प्रमाण आहे? तुम्हाला कशाचेही प्रमाण आज मिळालेले नाही. तेव्हा तुमच्यामध्ये जे प्रमाण आहे ते जागृत झालं पाहिजे आणि ते प्रमाण म्हणजे तुमच्या हृदयात बसलेला शिव आहे. तुमच्या हृदयामध्ये बसलेला अंतरात्मा जो आहे, तो मिळविल्याशिवाय कोणत्याही गोष्टीला तुम्ही प्रमाण मानलं, म्हणजेच अंधश्रद्धा आहे.

फक्त धर्मामध्ये रहायला पाहिजे होतं. अतिशयता करायला नको होती. मध्यमार्गात रहायला पाहिजे होतं, म्हणजे हे कार्य फार सहज झालं असतं. अजूनसुद्धा जेव्हा सहजयोग ह्या स्थितीला आलेला आहे, जिथे हजारो लोक पार होत आहेत. त्याचे अनेक अनुभव आलेले आहेत, हजारो लोकांना ह्याने फायदा झालेला आहे, पुष्कळ लोकांचा कॅन्सरचा रोगसुद्धा आम्ही ठीक केलेला आहे, तरीसुद्धा सहजयोगामध्ये अगदी हळूहळू प्रगती होते, मंद गतीने. पण एखाद्या भामट्याने असं सांगितलं, की तुम्ही कपडे उतरवून नाचा इथे! की लगेच पाचशे माणसं हजर. तेही दहा दहा रुपये देऊन. कपडे हरवले तरी हरकत नाही. म्हणजे अशा वेड्यांना सबंध मनुष्यजात इतकं डोक्यावर उचलून घेते. आणि जे खरं, सत्य आहे, त्याला घेत नाही. ह्याला कारण काय?

ह्याला कारण असं आहे, की आपल्याला अजून सत्याची ओळख पटलेली नाही आणि त्याची शक्ती आपण जाणलेली नाही, की सत्यामध्ये केवढी शक्ती आहे! सबंध आनंदाचा स्रोत हे सत्य आहे. ते मिळविल्याशिवाय बाकी ह्याला, कशालाही अर्थ लागणार नाही. ते आपण मिळवलं पाहिजे. ते कसं मिळवायचं, हे सगळ्यांनी सांगून ठेवलेले आहे. कबीरांनी सांगितलेले आहे स्पष्टच. कबीरांनी तर सबंध सहजयोगच वर्णन केलेला आहे. जर आपण गुरू ग्रंथसाहेब वाचला, तर ज्याच्यामध्ये नामदेवांचेसुद्धा पुष्कळ श्लोक आहेत. नानकांनी प्राथमिक, सुरुवातीपासूनच, सहजयोग सांगितलेला आहे. 'सहज समाधी लाग्यो, काहे रे बन खोजन जायी, सदा निवासी सदा आलेपा तोहे संग समायी। पुष्प मध्य जो बांस बसत है, मुकूटमाही जब ठायी, तैसेही हरि बसे निरंतर, घट ही खोजो भाई।' असं सांगितलं आहे त्यांनी. आता हे सगळे शीख लोक, 'घट ही खोजो भाई,' म्हणजे अडीच तासांमध्ये सबंध ते संपवलं पाहिजे, अखंड पाठ. आता काय म्हणावं ह्या लोकांना! मला समजत नाही, की ह्या वेड्यांच्या इस्पितळात मी कशी आले? म्हणजे सरळ दिसत असतांनासुद्धा, की असं करून परमेश्वर मिळत नाही आणि परमेश्वर हा मिळवायचाच आहे आपल्याला. नाहीतरी आपण ह्या एवढ्या वाऱ्या कशाला करतो? ही सगळी मेहनत कशाला करतो आपण सकाळपासून संध्याकाळपर्यंत? परमेश्वर मिळविण्यासाठी नां! मग का घेत नाही परमेश्वर? आणि तो मिळविल्यावरसुद्धा जमलं पाहिजे, त्याच्यामध्ये बसलं पाहिजे.

आता आपल्यासमोर इथे काही चार्ट नाहीये. पण चार्ट वगैरे आमचे हे लोक देतील आपल्याला. त्याच्यात आपण बघा, की आपल्यामध्ये कशी कुंडलिनी बसलेली आहे आणि कशी आपल्यामध्ये सात चक्रं आहेत आणि त्याच्यामुळे कशी आपल्या, ज्यांना आपण प्लेक्सस म्हणतो, त्यांना कशी शक्ती मिळते. तुम्ही आपल्या स्वतःच्या डोळ्यांनी कुंडलिनीचं जागरण बघू शकता. कुंडलिनीचं स्पंदन बघू शकता. ते बघायला पाहिजे. जे तुम्ही कधी पाहिलेलं नाही, जाणलेलं नाही, माहीत नाही, त्याच्यावर तुमचा विश्वास आहे. आता परवाच एक गृहस्थ, एका गुरूजींसाठी भांडायला उभे राहिले. 'अहो,' म्हटलं, 'तुम्ही पाहिलं का?' 'ते तर मेले.' 'मग तुमच्याशी बोलणं झालं का?' 'नाही?' ते तर नाही, मग तुमचा विश्वास कशावर? तुमचं त्यांनी काय भलं केलं? ते मला सांगा. 'तसं काही नाही माताजी, पण आमचा विश्वास आहे.' पण का? त्याच्यासाठी भांडायला उभे राहिले. म्हटलं, तुम्ही ह्यांची

वकिली का करता बुवा? तुम्हाला परमेश्वर मिळाला आहे का? बरं, तुमचे गुरू जर अस्सल असते तर आम्हीच त्यांच्यासमोर धावत गेलो असतो. पण तसं नाहीये. असतं तर आज तुमचं दुसरं असतं काहीतरी! असली अंधश्रद्धा घेऊन तुम्ही अंधारात का जाता? स्वत:वर थोडं तरी प्रेम करा आणि विचार करा. आजपर्यंत आम्ही कितीतरी असं वेड्यासारखं फिरलेलो आहोत आणि अंधारातच फिरत चाललो आहे. आता पुढे कधी हे ज्ञान येणार? म्हणजे वेदातसुद्धा म्हटलेलं आहे, की वेदामध्ये जर तुम्हाला ज्ञान झालं नाही, वेदापासून तुम्हाला ज्ञान झालेलं नाही, तर बाकी सगळं अज्ञान आहे. म्हणजे जोपर्यंत तुमच्यामध्ये प्रकाश येणार नाही, जोपर्यंत तुम्ही समाधीस्थ होत नाही, समाधी म्हणजे तुमची जी चेतना आहे, ती जागृत होणे. जोपर्यंत तुमच्यात जागृती होत नाही, तोपर्यंत ह्या वेदाला सुद्धा काही अर्थ नाही. असं स्पष्टच त्यांनी आधी सांगून ठेवलेलं आहे. पण असे फार कमी लोक आहेत जे जागृतीला उभे राहतात.

आता पुणे शहर! सगळं झाल्यावर आता पुणे शहर, हे म्हणजे बुद्धिजीवी आहे, असं लोकांचं म्हणणं आहे. बुद्धिजीवी असले तरी वारसा केवढा मोठा आहे, हे लक्षात घेतलं पाहिजे. एकाहून एक इथे मोठे संत-साधू येऊन गेले. तसेच किती लिखाण आपल्या मराठी भाषेत आहे! म्हणजे कुंडलिनीवर जितकं काही मराठी भाषेत लिहिलेलं आहे, तितकं कोणत्याही भाषेत नाही. परत नाथांनी फार मेहनत केली आपल्यावरती. महाराष्ट्रामध्ये जी मेहनत आहे, ती नाथांची आहे. साईनाथांसारखे मोठे, फारच मोठे अवतरण ह्या महाराष्ट्र भूमीत झालेले आहे. म्हणजे आपली जबाबदारी किती मोठी आहे, ते लक्षात घेतलं पाहिजे. अजूनही तो वेड्यासारखा आंधळेपणा स्वीकारून ह्याला भक्तीमार्ग म्हणण्यात काहीही अर्थ नाही. ह्या भक्तीलाही काही अर्थ नाही. आता भक्ती लोक करतात, दारू पितील, तंबाखू खातील, सिगरेट पितील. अरे जर तुम्हाला भक्तीमार्गाने परमेश्वर मिळाला असता किंवा भक्तीमार्गात तुम्हाला सबंध आनंद मिळाला असता, तर हे सगळे आनंद तुम्हाला तुच्छ वाटायला नकोत का? ही त्याची ओळख आहे. सगळं सुटलंय का तुमचं? तुम्हाला आनंद मिळालाय का? मी म्हणते स्वत:चा आनंद मिळवून घ्या. मग त्याच्यात एवढा विचार करायचा! हे अगदी सोपं काम आहे. आता पुष्कळांचं असं म्हणणं आहे, की फार कठीण काम आहे हे! पण नाही. आम्हाला वाटतं सोपय! आता तुम्हाला कठीण वाटतं. त्याला कारण असं आहे, ज्याला हे माहितीये काम, ज्याला हे सगळं माहिती आहे त्याला काहीच कठीण नाही. समजा, ह्या खोलीतील दिवे आणि पंख्यांचा स्विचबोर्ड आम्हाला माहिती नाही. आणि अंधारात कोणी सांगितलं, की जरासे दिवे लावा. तर आम्ही सगळीकडे चाचपडत फिरू. ह्याला हात लाव. त्याला हात लाव. कुठे शॉक बसेल, कुठेतरी धडपडणार. काही ना काही तरी होणार. मग म्हणायचं, की बुवा, फार कठीण काम आहे. पण ज्याला माहिती आहे, ज्याने हे काम केलेले आहे, ज्याने स्वत: स्विचबोर्ड लावलेला आहे, तो येऊन ते दिवे लावू शकतो की नाही? त्याला अगदी सोपं काम आहे. इतकेच नव्हे, जर मधे काही खराबी असेल, तर तेही तो ठीक करू शकतो. तसंच आहे. पण हे सोपं आहे म्हणून

यायचं नाही. ह्याला कोणतं शहाणपण म्हणता येईल हो!

मी म्हणते आता इथे जर एक हिरा आहे, अगदी तुम्हाला फुकट आहे तो. आणि तो तुम्हाला फुकटच मिळणार आहे आणि सहज मिळणार आहे. तर लोकांचं असं म्हणणं नाही होणार, की हा हिरा नाही. सगळे येतील. ऑस्ट्रेलियाहूनही येतील धावत. तसच समजलं पाहिजे. आपल्यामध्ये हा हिरा आहे. हा आत्म्याचा हिरा आपल्यामध्ये लपलेला आहे. तो हिरा आपण जाणलाच पाहिजे. हा आपला वारसा आहे. आपला हक्क आहे. तो हक्क आपण बजावून घेतला पाहिजे. त्याला काही फार लायकी लागत नाही सहजयोगामध्ये. आमच्या प्रेमात जर लायकी असली, तर आम्ही तुम्हाला लायक करू. लहान मुलं काही फार लायक नसतात, पण आई मेहनत करून करते नां! तसाच हा प्रकार आहे.

तेव्हा सहजयोग म्हणजे अत्यंत साधा, सरळ आणि सरळ लोकांना फार लवकर गम्य असा आहे. पण आता तुम्ही बुद्धिवादी असल्यावर थोडासा मागे सरकतो. बुद्धीची जोड द्यायला हवी. पण बुद्धीला बेफाम सोडलं नाही पाहिजे. बुद्धीवर आक्रमण केलं पाहिजे. बुद्धीने तुमच्यावर जर आक्रमण केलेलं असलं, तर तुम्ही गुलाम आहात. पूर्ण स्वतंत्रतेतच सहजयोग घटित होतो.

आता उद्या मी आपल्याला सविस्तर सांगणार आहे की आपल्यामध्ये कुंडलिनी काय आहे? कुठे आहे? कशी आहे? आपल्यामध्ये 'मी' पणा कशाला? तो 'मी' पणा कसा ही कुंडलिनी ओढून काढते? हे सगळं घडतं. हे काही भाषण नाहीये, की कोणाला सांगायचं की हे बघा तुमचं हे असं झालं पाहिजे. तुम्ही हे करा, ते करा, तशातलं काही नाही. हे घडावं लागतं. हे घडवावं लागतं. जसं बी मधून वृक्ष निघतो. काहीतरी घटना झाली पाहिजे, तसेच. तसं झाल्याशिवाय बाकी सगळं लेक्चर, भाषण निरर्थक आहे. खरं काय ते मिळवलं पाहिजे. ते आपल्यामध्ये परमेश्वराने ठेवलेलं आहे. सहज आहे. एक दिवा दुसऱ्या दिव्याला पेटवतो. तसेच आम्ही तुमच्यातील ज्योत पेटवणार आहोत. त्या पलीकडे काहीही नाही. अगदी साधी, सरळ गोष्ट आहे. ती तुम्ही घ्यावी, ती स्वीकारावी आणि त्याचा आनंद उचलावा.

ह्या उपरांत काही प्रश्न असतील विचारावे. ते बरं होईल. कारण नंतर ध्यानाला बसल्यावरती लोक प्रश्न विचारतात. फार लांबलचक विचारू नका आणि असे प्रश्न विचारू नका, की एक बाबाजी होते, ते असं म्हणाले, तमके होते ते तसं म्हणाले. जे काही म्हणाले असतील त्याचा तुम्हाला काही लाभ झालेला दिसत नाही. असेल तर तसं दिसलं असतं. तेव्हा आता नवीन जी गोष्ट आहे तिकडे लक्ष द्यावं आणि पहावं, की आम्हाला त्याचा काही लाभ होतो की नाही. काही प्रश्न असतील तर ते इथे येऊन विचारा व्यवस्थित. काही घाबरण्याची गोष्ट नाही.

कुंडलिनी कशी जागृत होते? त्याचा संबंध आपल्या स्वयंचालित संस्था म्हणजे ऑटोनॉमस नर्व्हस सिस्टीमबरोबर कसा आहे? वगैरे वगैरे उद्या मी व्यवस्थित समजावून सांगणार आहे. पण तरीसुद्धा एखादा प्रश्न असेल तर विचारा.

असे हात करून बसा. असे साधे. कोणी आजारी वगैरे असतील तरी असे हात करून बसा. आजारही ठीक होतो आपोआपच. काही असलं तरी असे हात करून बसायचं. काही त्याला जास्त करायचं नाही. फक्त असे हात करून बसा. आहे प्रश्न? काय म्हणता? बरं आता दोरे, गंडे, ताईत वगैरे असतील गळ्यामध्ये तर काढून टाका. काळं वगैरे काही असेल तर काढून टाका. त्याने हे फार.........(अस्पष्ट) आम्ही पाहिलेलं आहे. मला आश्चर्य वाटतं की त्याने किती परिणाम होतो माणसावर! तेव्हा असं काही असलं तर काढून टाकावं. कृपा करून काढून टाका. नाहीतर कुंडलिनी जागृत होणार नाही.

ह्यांचा प्रश्न अष्टांग योग आणि सहजयोगावर.

आता अष्टांग योग म्हणजे त्या काळी सुरुवातीला केला होता, जेव्हा आपल्यामध्ये शिक्षण पद्धती फार वेगळी होती. त्यावेळेला लहान मुलं पाच वर्षापासून ते वीस-पंचवीस वर्षापर्यंत गुरूकुलात जाऊन रहात असत. जे गुरू असायचे ते सगळे आत्मसाक्षात्कारी असायचे. त्या गुरूंच्या नावावरच त्या संस्था चालत असत. म्हणजे तुमचं जे गोत्र आहे, ती त्या गुरूंची संस्था होती. तिथे तुमचे वाडवडील, तुमचे गोत्र जे आहे, ते त्या युनिव्हर्सिटीमध्ये शिकलेले आहेत. म्हणजे समजा तुमचं जर गौतम गोत्र आहे, म्हणजे गौतम मुनींच्या इथे तुमचे वाडवडील शिकत असत. मग त्या गोत्रामध्ये विवाह होत नसे. कारण पूर्णतया त्यांना यमनियम पाळून ब्रह्मचर्यात रहावं लागत असे. आता ब्रह्मचर्यात रहायचं तर त्याला सगळे भाऊ-बहीण आहेत, ही भावना जागृत करण्यासाठी म्हणून ते गोत्र म्हणत असत आणि त्या गोत्रामध्ये कधीही लग्न व्हायचे नाही. सगोत्र विवाह आपल्याकडे नाहीये हे आपल्याला माहिती आहे. त्याला कारण हेच आहे. म्हणजे संपूर्ण ब्रह्मचर्यामध्ये तिथे रहायचं.

त्याच्यानंतर सबंध जेव्हा त्यांचं शिक्षण होत असे, तेव्हा त्याच्यातले जे विद्यार्थी अत्युत्तम होते, त्या कार्याला सुज्ञ होते, अशा विद्यार्थ्यांना घेत असत आणि त्याच्यामध्ये अष्टांग योग म्हणजे यमनियम आदि सगळं काही मिळवून त्या जंगलामध्ये तिथे ती मुलं रहात असत, तसंच आपल्याकडे त्यावेळेला चार आश्रम होते, त्यापैकी जे वानप्रस्थाश्रमातले लोक होते, म्हणजे ते आपण म्हणू शकू की आजोबा, आजी वगैरे असे लोक त्या ठिकाणी रहात असत. तर तेही ह्या मुलांना मदत करत असत आणि त्यांना प्रेम देत असत. अशा परिस्थितीत अत्यंत पुनीत आणि पवित्र वातावरणामध्ये सबंध यमनियम आदि पाळून हे अष्टांग योग साधण्यात येत असत आणि ते सुद्धा एका आत्मसाक्षात्कारी गुरूच्या मदतीने होत असे. म्हणजे सबंध मेडिकल तुम्ही घेतलं तर त्याच्यामध्ये अनेक औषधं आहेत. आजकाल लोकांनी जो काही अष्टांग योग साधला आहे, म्हणजे नुसती आसनं. तो त्याच्यातला चोविसावा भागसुद्धा नाही. आता आसनांवरसुद्धा सगळी आसनं काही करायला नको. म्हणजे जर समजा तुम्हाला पोटाचा त्रास असला तर त्याला हे आसन असं औषध. ते गुरू सांगायचे की तू हे आसन कर म्हणजे बरं होईल. आमच्या सहजयोगातही आम्ही आसनं सांगतो. जर असा काही शारीरिक त्रास

असला तर त्याला एखादं आसन करायला काही हरकत नाही. पण त्याच्यामध्ये आधी, पहिल्यांदा ईश्वर प्रणिधान! ईश्वर प्रणिधानावर फार लक्ष होतं. ईश्वर प्रणिधान म्हणजे असं, की कोणत्या चक्रावर ईश्वर आसन्न आहेत. म्हणजे कोणत्या देवता बसलेल्या आहेत, त्याचं सबंध निरीक्षण करणे. त्याप्रमाणे तुम्हाला मंत्र देणे. वगैरे म्हणजे फारच मोठं सायन्स होतं ते. ते सुद्धा सगळं काही फार कमी लोकांना ज्ञात होतं आणि त्याचा अधिकार फार कमी लोकांना होता. म्हणजे राजा जनकाच्या वेळेला एक नचिकेत, एकच नचिकेत त्यांचा शिष्य होता आणि त्याला सुद्धा तीनदा त्यांनी नाकारलं.

आता त्याची एवढी सबंध स्टोरी सांगायची म्हणजे फार वेळ होईल. पण ती फार मोठी कहाणी आहे. तर असा एखादाच मनुष्य त्याचा अधिकारी समजला जात असे आणि तो हे कार्य करत असे. आता काय झालंय, काही गुरू लोक, काही, एखादेच असतील असे, हिमालयावर वगैरे होते. तिथे त्यांनी आपलं गुरूकुल वगैरे स्थापन केलंय. तिथे आपले काहीतरी अर्धवट लोकसुद्धा जात असत. मग त्या अर्धवटांना ते काढून टाकत. त्यांनी ही आसनं वगैरेंची पुस्तकं वाचून, ते खाली आले आणि त्यांनी शिकवायला सुरुवात केली. हे फार चुकीचं आहे. अष्टांग म्हणजे सबंध सम्यक करायला हवं. ईश्वर प्रणिधान पाहिजे. जर तुम्ही नुसतीच आसनं केली तर तुमचं हृदय चक्र धरतं आणि हार्ट ॲटॅक येण्याची भीती असते. कुंडलिनी जागृती होत नाही. जर कोणी अष्टांग योग केला असेल तर फार मोठ्या मुश्किलीने कुंडलिनी जागृत होते. कारण अष्टांग योग म्हणजे नुसती आसनं, बाकी काही नाही. ईश्वर प्रणिधान वगैरे काही नाही. अर्धवट लोकांपासून शिकून हा त्रास झालेला आहे.

बरं हे इतकं पॉप्युलर का आहे? कारण आजकाल म्हणजे सिनेमा ॲक्ट्रेसेस वगैरे, ॲक्टर, हे फार पॉप्युलर आहेत, तेव्हा सगळ्यांना तेच व्हायची इच्छा होते. म्हणून सगळे लोक आपल्या शरीराची खूप मोडतोड करत असतात सकाळपासून संध्याकाळपर्यंत. तुम्हाला ते किती सुट करतं. तुम्हाला काय करायचं आहे आणि काय नाही, आणि शरीरच सगळं काही नाहीये. मन पण आहे, बुद्धी पण आहे. जो मनुष्य अशा प्रकारे अष्टांग योग करतो, तो अतिशयतेला उतरल्यामुळे अतिशय निरस आणि क्रूरही होऊ शकतो. फार क्रूर होईल. अशा लोकांची लग्नं मोडतात बहुतेक. डिव्होर्सेस (घटस्फोट) होतात. असे अनेक प्रकार आहेत. आणि आपण असा विचार केला पाहिजे, की पातांजली योगशास्त्र वाचल्यावर मग जर आपण त्याचा पूर्ण विचार केला, तर लक्षात येतं, की हे आज, सध्याच्या काळाला मुळीच चालू शकत नाही. म्हणून अष्टांग योग म्हणून आजकाल पुष्कळ लोकांनी काढलेलं आहे. मी पाहिलेलं आहे आणि त्याला सरकारीसुद्धा फार मदत झालेली आहे. पण हे फार चुकीचं आहे. त्याने आमच्याकडे, आता आपल्याला माहिती असेल, ह्या टिव्हीमध्ये ज्या बाई अष्टांग योग शिकवत असत म्हणजे अष्टांग जे आसनं करत असत, त्या माझ्याकडे पार व्हायला आल्या. माझे हात तुटून गेले. ती मला म्हणे, 'मला पार करा.' म्हटलं, 'हे आता सोड बाई, नाहीतर माझ्याच्याने व्हायचं नाही.' पण ते काही सुटता सुटत नाही. पार होता होईना. कारण त्याच्यावर पैसे कमवता येतात नां! त्याचे क्लासेस! परमेश्वराचे क्लासेस नाही काढू शकत. कोणी नाही काढू शकत. सगळं उलटं आहे माणसाचं. जसं काही तो स्वत:चं करतो तसं देवाचंही खोबरं करून टाकतो. हे अष्टांग योग सगळं

चुकीचं आहे. हे जे त्यावेळेचं होतं, त्या वेळेला जे ठीक होतं आणि करता येत होतं. कारण त्यावेळेची समाजव्यवस्था अत्यंत सुघटित आणि सुंदर होती. ती आज वेळ नाहीये. तेव्हा ह्यावेळेला जो अष्टांग योग म्हणून जी आसनं करतात, त्याने सर्व तऱ्हेचे त्रास फक्त तयार होतील. दुसरं काही होणार नाही. पहिल्यांदा म्हणजे हार्ट ॲटॅक येणार अष्टांग योग्याला. तर माझं असं म्हणणं आहे, की त्याचं सबंध शास्त्र शिकलं पाहिजे आणि एवढा द्राविडी प्राणायम पाहिजे कशाला? कुंडलिनी बसलेली आहे. तुमचं सगळं काही ठीकठाक आहे. कुंडलिनी वगैरे ते पार झालं. मग त्याच्यात एखादं आसन करावं लागतं कधीकधी. विशुद्धी चक्रावरती एखादं आसन करायचं असलं तर विशुद्धी चक्रावर करा. पण जाणकार लोक पाहिजे त्याला. समजलं पाहिजे. नाहीतर दुखतंय विशुद्धी चक्रावर आणि तुम्ही आपली नाभीच रगडत बसले तर फायदा काय त्याचा! म्हणजे सबंध औषधं एखाद्या त्या मेडिकल स्टोअरमधून घेऊन टाकावीत तशी ह्यांची आसनं आहेत आणि ही गोष्ट खरी आहे. आपल्या लक्षात येईल. आता एखादा हठयोगी आला तर आपल्या लक्षात येईल. आम्ही दाखवू तुम्हाला. मग आता पुढे. म्हणून बाकीचे योग जे आहेत, ते तरी कशाला करत होते त्यावेळी? त्यावेळी एवढ्यासाठी करत होते, ह्या महायोगासाठी.

म्हणजे जर आम्हाला पुण्याला यायचं असलं, तर आम्ही गाडी करू. स्टेशनवर जाऊ. तिकीट घेऊ. मग त्या गाडीत बसू. इथे येऊ. परत स्टेशनवरून दुसरी गाडी करून इथे येऊ. इथे आल्यावर खरोखर महायोग होणार आहे. म्हणजे आपली आणि माझी गाठ पडली. हा महायोग झाला. आता त्याच्यासाठी तिकीट घेणं त्यावेळी बरोबर होतं. पण आता आल्यावर तिकीट कशाला घ्यायचं? म्हणजे लोकांचं हेच आहे, हरी, हरी करत बसले, आता हरी येऊन ठाकला, तरी हरी, हरी करत चालले पुढे. अहो, इकडे या. असं म्हटलं तरी त्यांच्या लक्षात येत नाही. तशातला प्रकार आहे. अगदी तशातला प्रकार आहे. आपल्याला आश्‍चर्य वाटेल. जे ज्यावेळेला उपयुक्त आहे तेच केलं पाहिजे. तेव्हा आपल्याला भेटायला आम्ही आलो. ह्यावेळेला आम्ही जर आमचं तिकीट काढायला लागलो पुण्याचं, तर लोक म्हणतील, अहो, तुम्ही पुण्यातच आहात. पुण्यातच तुम्ही भाषण देत आहात आणि लोक ऐकत आहेत. आणि आता ह्याचं तिकीट कशाला काढता? तुम्ही मुंबईला नाही. आता कळलं का? आता इथे आहोत. वर्तमान काळामध्ये. इथे थांबता आलं पाहिजे. ते कुंडलिनीच्या साहाय्याने होतं. मनुष्य वर्तमानात येतो. ते मिळवलं पाहिजे.

ही आजची प्रस्तावना झाली. उद्या जरा कठीण सांगणार आहे मी. पण आज पार होऊन घ्या आधी.

आता असे हात करून बसा. आता डोळे मिटा. डोळे मिटल्यावर पुष्कळ लोकांचे डोळे सहजच मिटले जातात. त्यांना काही त्रास होत नाही. पण काही काही लोकांचे डोळे माझ्यासमोर मिटले जात नाही. त्यांच्या पापण्या हलू लागतात. तेव्हा अशा लोकांनी डोळे उघडे ठेवायचे. ज्यांचे डोळे अगदी सहज मिटले गेले, त्यांनी डोळे मिटून ठेवावेत आणि दोन्ही हात माझ्याकडे करून लक्ष आपल्या मनाकडे ठेवावं आणि विचारावं, की

आतून काय विचार येतोय? मनाला विचारावं की, तू काय विचार करतो आहेस बुवा? जर कोणताही विचार येत नसला, तर ह्याचा अर्थ असा आहे की कुंडलिनी ही आज्ञा चक्राच्या वर गेली. म्हणजे निर्विचार समाधी साधली आहे. हे तत्क्षण होतं. वेळ लागत नाही, जर तयार असलं तर. जर तयारी नसली तर कुंडलिनी मेहनत करून तयारी करवून घेते सुद्धा आणि सहजयोगीसुद्धा मेहनत करू शकतात.

त्याच्यानंतर कुंडलिनी जेव्हा ब्रह्मरंध्र छेदते, त्यावेळी आतून थंड थंड असं गार वाऱ्यासारखं येतं. फार सिरियस बसू नका. विषय फार सिरियस नाहीये. सबंध लीलाच आहे. खेळच आहे मुळी परमेश्वराचा. तेव्हा हातामध्ये थंड थंड असं गार वाऱ्यासारखं लागतं. असे हात ठेवा. असे हात ठेऊन बसा. नाहीतर म्हणाल आमच्या हातातून नाही आलं. सरळ बसायला काय लागतं लोकांना? अगदी असं बसायचं. हातामध्ये गार गार येऊ लागतं आणि हातामध्ये जेव्हा थंड थंड, गार गार येऊ लागतं तेव्हा समजायचं, की ब्रह्मरंध्रातून कुंडलिनी छेदून बाहेर निघाली. जर आपण आपल्या ब्रह्मरंध्रावर हात ठेवला, तरी लक्षात येईल की थंड येतंय. पण आधी गरम येईल. पुष्कळ लोकांच्या आतून जी गरमी असते, ती निघते ब्रह्मरंध्रातून. जेव्हा तशी कुंडलिनी निघते, तेव्हाच तुमच्या हातातून गार, गार, 'सलिलं, सलिलं' येऊ लागतं. म्हणजे हे साक्षात् घडतं. त्याने तुमच्यामध्ये साक्षात् हे जागृत होतात. ही बोटं, ही पाच चक्रं, सहा आणि सात चक्र जागृत होतात. त्या जागृतीमुळे तुम्ही स्वतःच्या चक्रांबद्दल जाणू शकता, तसंच इतरांच्या चक्रांना जाणू शकता. हे सगळं मी तुम्हाला सांगणार आहे व्यवस्थित. पण सध्या बघा हातात थंड येतंय. कॅन्सरचा रोग कुंडलिनी जागृतीने ठीक होणार आहे. अनेक रोग कुंडलिनी जागृतीने ठीक होतात. पण ते मुख्य नाहीये. म्हणजे जर एखाद्या मंदिरात आपल्याला देवाचं स्थान बसवायचं असलं की आपण ते मंदिर स्वच्छ करतो. तसेच आहे. मुख्य कार्य देवाची स्थापना आहे.

हाताकडे लक्ष ठेवा, डोळे मिटून. हातामध्ये थंड, थंड, गार असं वाऱ्यासारखं येत आहे का? जरा क्षमा करा, क्षमा करा सगळ्यांना. जरा बोलायचं आहे. क्षमा करा. कृपा करून क्षमा करा. सगळ्यांना क्षमा करा. काहीही मनात धरू नका. सगळ्यांना क्षमा करा. सर्व सहजयोग्यांनीसुद्धा खूप गहन उतरलं पाहिजे. सध्या अशी स्थिती आहे आज, फार जोरात व्हायब्रेशन्स आहेत. तेव्हा डोळे मिटून गहन उतरायचं. स्वतःकडेच लक्ष द्या सध्या. आता ज्या लोकांच्या हातामध्ये थंड, थंड येत आहे, त्यांनी हात वर करायचे. दोन्ही हात वर करा सगळ्यांनी, ज्यांच्या हातात थंड येतंय. आता हात खाली करा. थोडसं डोक्यावरही बघा थंड येतंय का, ह्या इथे. डावा हात माझ्याकडे करायचा आणि उजवा हात असा करून बघा. डावा हात माझ्याकडे आणि उजवा हात डोक्यावर ठेऊन बघा. गार यायला पाहिजे. व्यवस्थित. गार येतंय का वर? ठेवलं म्हणजे कळतं. गार यायला पाहिजे. आता हात असे परत ठेवा. आपल्याच हाताने आपण आपली कुंडलिनी वर करू शकतो. म्हणजे काय, डावा हात माझ्याकडे करायचा असा आणि उजव्या हाताने अशी कुंडलिनी वर न्यायची. आपल्याच हाताने आणि असं करून टाकून द्यायचं परत. परत अशी उचला.

# पवित्र आत्मा

**गणपतीपुळे, २५ डिसेंबर २००३**

मी मराठीत बोलायचे म्हटले तर एवढेच सांगायचे, की ख्रिस्तांचे आयुष्य अत्यंत दु:खमय होते, पण ते त्यांनी हसून निभावलं. कारण तो पवित्र आत्मा होता. अशा माणसाला कोणतेही दु:ख होत नाही. पण त्यांच्यामुळेच आपण सर्वांनी प्राप्त केलं आहे आध्यात्मिक जीवन. त्यामुळे इतर लोकांनासुद्धा पुष्कळ फायदा होऊ शकतो. कारण ते आपलं आयुष्य बघतात आणि त्यांना आश्चर्य वाटतं की हे मानव असून इतके खुश, आनंदी असे कसे? पण जेव्हा त्यांना कळतं हे सहजयोगामुळे घडलं तेव्हा ते ही सहजयोगात येतात. ही कमालीची गोष्ट आहे. ते वरदान तुम्हाला मिळालेले आहे. फक्त ते जपून ठेवलं पाहिजे. त्याच्यावर मेहनत केली पाहिजे आणि सगळ्यात मुख्य म्हणजे दुसऱ्यांना दिलं पाहिजे. एकटं तुम्ही अनुभवून होत नाही. हा अमृताचा पेला तुमच्या तोंडात आहे तो दुसऱ्यांच्याही जाऊ देत. दुसऱ्यांनाही बरं वाटू देत. त्यांचंही भलं होऊ देत. म्हणून सर्व सहजयोग्यांनी प्रयत्न केला पाहिजे की आम्ही दुसऱ्यांनाही सहजयोगात उतरवू. सगळ्या जगात सहजयोग पसरला आहे. तो फार थोडा आहे. आणखीन पसरायला पाहिजे. ख्रिस्तांचे फक्त बारा शिष्य होते आणि त्यांनी ख्रिश्चानिटी वाढवली. पण केवढ्या चुका झाल्या त्यांच्या. पुष्कळच चुका झाल्या. जेव्हा तुम्ही सहजयोग पसरवता तेव्हा त्या चुका करू नका. सरळ, धोपटमार्गाने ते काही कठीण नाही. **त्याच्यामध्ये परमेश्वराने तुम्हाला शक्ती दिलेली आहे, बुद्धी दिली आहे ती वापरा.** मला पूर्ण विश्वास आहे की तुमच्या हातून किती तरी सहजयोगी होऊ शकतात आणि तुम्ही तसा प्रयत्न करावा. रात्रंदिवस हाच विचार करावा, की आम्ही कोणाला पार करू? कोणाला आम्ही याचे वरदान देऊ? ही फार मोठी जबाबदारी तुमच्यावर आहे. जसा तुम्हाला सहजयोग मिळाला तशीच ही जबाबदारी तुमच्यावर आलेली आहे. तेव्हा मनामध्ये हाच निश्चय करायचा की आम्ही दुसऱ्यांनाही सहजयोग देऊ. स्वत: पुरते ठेवणार नाही.

अनंत आशीर्वाद आहे तुम्हाला!



तुमचा पुनरुद्धार होण्याची फार महान संधी या जन्मात तुम्हाला मिळाली आहे आणि तुम्हाला माहीतच आहे, की हाच उत्क्रांतीचा शेवटचा टप्पा आहे. आता तुम्ही मन बाजूला ठेवा. कारण मनाच्या व्यापारामध्येच रहाल तर तुम्ही मनाच्या पलीकडे जाऊ शकणार नाही; सहजयोगाची प्रगती ही मनाचं काम थांबल्यावरच होणार आहे. मगच तुम्ही स्वतःला ओळखू शकाल.

प.पु.श्रीमाताजी, कोलकाता, एप्रिल ९५

✦ प्रकाशक ✦
निर्मल ट्रांसफॉर्मेशन प्रा. लि.
प्लॉट नं.१०, भाग्यचिंतामणी हौसिंग सोसायटी, पौड रोड, कोथरुड, पुणे - ४११ ०३८.
फोन : ०२०-६५२२६०३१, ६५२२६०३२, e-mail : sale@nitl.co.in, website : www.nitl.co.in



दिवाळीचा अर्थच हा आहे, की आपण जसे बाहेर दिवे लावतो तसे आपल्या सर्वांच्यात देखील ते प्रज्वलित झाले पाहिजेत. आपल्याला माहीत आहे, की या अंध:कारातील वातावरणात आपण सर्वजण प्रकाश आहात, दिवे आहात. आपल्याला प्रकाश पसरवायचा आहे. पण जर आपल्या आत प्रकाशच कमी असेल, तर आपण बाहेरच्यांना कसा प्रकाश देऊ शकाल? याचा आपण विचार करा. तर पहिल्यांदा आपण सहजयोग्यांनी लक्षात घेतलं पाहिजे, की आपला आतला प्रकाश जागृत ठेवा.

प.पू.श्रीमाताजी, दिल्ली, १० नोव्हेंबर २००७